महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक – ३०८५/४३ दिनांक :- १३ ऑगस्ट, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळाप्रमाणेच बनावट अनधिकृत संकेतस्थळाची निर्मिती; अज्ञात व्यक्तींविरुद्ध सायबर सेलकडे तक्रार दाखल

**म्हाडाच्या सदनिकांचे वितरण संगणकीय सोडतीद्वारेच, म्हाडा सोडतीसाठी अर्ज करण्याकरिता 'म्हाडा'च्या अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा –** म्हाडा उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल

मुंबई, दि. १३ ऑगस्ट, २०२४ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) https://mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळाशी नामसाधर्म्य असणारे बनावट अनधिकृत संकेतस्थळ तयार करण्यात आले असून या माध्यमातून काही नागरिकांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले असल्याने म्हाडा प्रशासनातर्फे सदर बनावट संकेतस्थळ निर्माण करणाऱ्या अज्ञात व्यक्तींविरुद्ध सायबर सेलमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे.

म्हाडातर्फे नुकतीच मुंबईतील विविध गृहप्रकल्पातील २०३० सदनिकांची सोडत जाहीर करण्यात आली असल्याने, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी राज्यातील इच्छुक अर्जदारांना सावधानतेचा इशारा देत आवाहन केले आहे की, सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्याकरिता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरूनच सोडतीसाठी अर्ज नोंदणी करून सोडत प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे. सोडत प्रणालीमध्ये पात्र ठरलेले अर्जदारच संगणकीय सोडतीत सहभाग घेऊ शकतील. अशाप्रकारे संगणकीय सोडतीच्या माध्यमातूनच म्हाडा सदनिकांचे वितरण केले जाते. याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारे म्हाडाच्या सदनिकांचे वितरण केले जाऊ शकत नाही याबाबत नागरिकांनी दक्षता घ्यावी असेही श्री जयस्वाल यांनी स्पष्ट केले आहे.

काही अज्ञात व्यक्तींनी म्हाडाच्या https://mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळासारखे दिसणारे हुबेहूब बनावट अनधिकृत संकेतस्थळ mhada.org या नावे

तयार केले आहे. बनावट संकेतस्थळाचे होम पेज, पत्ता व पहिल्या पानावरील संकेतस्थळाची रचना म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळासारखीच आहे. मात्र, या बनावट संकेतस्थळावर अर्ज प्रक्रिया न राबविता थेट पेमेंटचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. म्हाडाचे घर मिळवून देण्याचे आश्वासन देत सदर अज्ञात व्यक्तींनी फसवणूक झालेल्या व्यक्तीस बनावट संकेतस्थळ व त्यावरील उपलब्ध पेमेंट लिंकबाबत माहिती दिली व त्यांनी म्हाडाच्या प्रकल्पातील सदनिकेच्या एकूण विक्री किंमतीपैकी रु. 50,000 इतकी रक्कम या बनावट संकेतस्थळावरून दिलेल्या लिंकवरून ऑनलाइन भरून घेण्यात आली. तसेच याच बनावट संकेतस्थळावरून बनावट पावतीही उपलब्ध करून दिल्याचा प्रकार घडला आहे.

म्हाडाच्या संगणकीय सोडतीकरिता IHLMS 2.0 ही संगणकीय सोडत प्रणाली वापरण्यात येत आहे. ही प्रणाली अत्यंत सोपी, सुलभ, सुरक्षित आणि महत्वाचे म्हणजे पूर्णता ऑनलाइन आहे व यामुळे ही प्रणाली मानवी हस्तक्षेपास वाव देत नाही. म्हाडाच्या सोडत प्रणालीमध्ये अर्जदारांची नोंदणी प्रक्रिया झाल्यावर त्यांचे कायमस्वरूपी प्रोफाइल तयार होते. या प्रोफाइलमध्ये अर्जदार आपले कागदपत्र सादर (upload) करतील. या कागदपत्रांची प्रणालीद्वारे पडताळणी केली जाते व पात्र कागदपत्रांनुसार अर्जदाराची पात्रता निश्चिती केली जाते. यानंतरच अर्जदार सोडतीसाठी अर्ज करू शकतील व अर्ज भरल्यानंतरच अनामत रकमेचा भरणा करण्याबाबतचा पर्याय या प्रणालीमध्ये उपलब्ध होतो.

मात्र, फसवणूक झालेल्या व्यक्तीने ही कोणतीही प्रक्रिया न राबविता थेट अज्ञात व्यक्तींद्वारे कळविण्यात आलेल्या रकमेचा भरणा या बनावट संकेत स्थळावर केल्याचे समजले आहे. मंडळातर्फे कळविण्यात येत आहे की https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरून अर्ज प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय थेट अनामत रक्कमेची मागणी केली जात नाही. करिता अर्ज सादर करतेवेळी सोडत प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे नीट अवलोकन करून माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या रकमेइतकेच अनामत रकम उत्पन्न गटनिहाय ऑनलाइनच अदा करावी. तसेच ही प्रक्रिया मानवी हस्तक्षेपाशिवाय कार्यरत असल्याने म्हाडा कर्मचारी अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारे रोख रकमेची मागणी केली जात नाही. नोंदणी ते सदनिकेचा ताबा या सर्व प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच केल्या जातात.

मंडळातर्फे आवाहन करण्यात येत आहे की, म्हाडा सोडतीसाठी अर्ज करण्याकरिता https://housing.mhada.gov.in हे अधिकृत संकेतस्थळ असून या व्यतिरिक्त कुठल्याही

अनधिकृत संकेतस्थळावर अर्जदारांनी सोडतीत सहभाग घेऊ नये, कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नये तसेच कोणतेही आर्थिक व्यवहार करू नये. तसेच मुंबई मंडळातर्फे सदनिकांच्या विक्रीकरिता किंवा तत्सम कोणत्याही कामासाठी कोणत्याही समाजमाध्यमांची, त्रयस्थांची, संस्थांची अथवा इतर मध्यस्थांची मदत घेण्यात आलेली नाही. तसेच कोणालाही प्रतिनिधी/ सल्लागार/ प्रॉपर्टी एजंट/मध्यस्थ/ दलाल म्हणून नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर आर्थिक व्यवहार करू नये आणि तसे केल्यास मंडळ अथवा म्हाडा प्रशासन जबाबदार राहणार नाही. नागरिकांना असेही आवाहन करण्यात येत आहे की, त्यांची अशाप्रकारे कोणी व्यक्ति/ दलाल काही प्रलोभने देऊन फसवणूक करीत असल्याचे आढळल्यास त्यांनी 'म्हाडा'च्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी तसेच उपमुख्य अधिकारी (पणन) मुंबई मंडळ यांचे कार्यालयास कळवावे.

###

स्वाक्षरीत /-

(वैशाली गडपाले)

मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

================================================================================

Outward No. 3085/42 Dt. 26/08/2024

**Press Release**

# MHADA Issues Warning Over Scam Website, Reaffirms Flats Only Available Through Official Lottery

Use Only MHADA's Official Website for Housing Scheme Applications – MHADA Vice President and CEO Mr. Sanjeev Jaiswal

Mumbai, August 13, 2024: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has uncovered the existence of a fake website, https://mhada.org, which closely resembles the official MHADA site https://mhada.gov.in. This fraudulent site has already deceived several citizens, leading MHADA to file a formal complaint with the Cyber Cell against unknown individuals responsible for creating the site.

Following the announcement of a lottery for 2,030 flats across various housing projects in Mumbai, MHADA's Vice President and CEO, Mr. Sanjeev Jaiswal, urged applicants to exercise caution. He emphasized that all applications must be submitted through MHADA's official website https://housing.mhada.gov.in, as only those who apply through this platform will be considered for the computerized lottery draw.

Mr. Jaiswal clarified that MHADA flats are allotted exclusively through this computerized system, which is secure, fully online, and free from human interference. He strongly warned citizens to be wary of any claims or promises made outside this official process.

The fake website, https://mhada.org, mimics the appearance of MHADA's official site but bypasses the legitimate application process, offering direct payment options instead. Victims were misled into paying Rs. 50,000 on this fake site with the promise of securing a flat, even receiving a fraudulent receipt afterward.

MHADA uses the IHLMS 2.0 computerized lottery system, known for its simplicity and security. Once registered on the official platform, applicants can upload their documents,

which are verified by the system to determine eligibility. Only then can they participate in the lottery and make the necessary deposit payments.

However, in the cases reported, victims skipped these steps and made payments directly to the fraudulent website as instructed by the scammers.

MHADA stresses that under no circumstances does it demand direct payments without completing the official application process. The entire procedure, from registration to the handover of flats, is conducted online without any need for cash transactions or intermediary involvement.

MHADA urges the public to avoid engaging with any unofficial websites or sharing personal information with unauthorized individuals. Additionally, the Mumbai Board does not use any social media, intermediaries, agencies, or other middlemen for the sale of apartments or for any other related tasks. No agents, consultants, or intermediaries have been appointed by MHADA for the sale of flats or any related activities. Citizens are advised to report any suspicious activity or attempts at fraud to MHADA's Chief Vigilance and Security Officer or the Deputy Chief Officer (Marketing) of the Mumbai Board.

For further information and to ensure safe participation in MHADA schemes, applicants should only rely on the official website, https://housing.mhada.gov.in.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / Authority